प्रतिभावंत साहित्यिकाचा प्रवास - 'माझा रशियाचा प्रवास'

डॉ. गणेश लहाने
मराठी विभाग
दयानंद कला महाविद्यालय, लातूर

मराठी साहित्य विश्वाला पडलेले एक पहाटेचे स्वप्न म्हणजे अण्णा भाऊ साठे होय. कारण दीड दिवस शाळेत जाऊन साहित्याचा सम्राट झालेला माणूस जगात दुसरा कोणीच नाही. पारंपरिक समाजव्यवस्थेत ज्यांच्या अनेक पिढ्या गुलामगिरीत जगत आणि उच्चवर्णीयांची कामे करण्यात गेल्या अशा समाजात एक प्रतिभावंत साहित्यिक, कलावंताचा जन्म होणं म्हणजे मातीत रत्न सापडण्यासारखे आहे. असा रत्न मातंग समाजात जन्मास आला आणि आपल्या लेखणीच्या, डफ तुणतुण्याच्या माध्यमातून त्यांनी श्रमीकांचे, कामगारांचे, शोषितांचे, पीडितांचे अन्याय अत्याचार सहन केलेल्या दुःखी माणसांच्या व्यथा, वेदनांचे सुख दुःखाचे चित्रण आपल्यासबंध साहित्यातून केलेले आहे. अण्णा भाऊंच्या साहित्यातून सामान्य माणसांचे जगणे प्रकट झाले आहे. आपल्या साहित्य विषयक भूमिकेविषयी अण्णाभाऊ लिहितात की, मी ज्या मातीत जन्मलो, वाढलो जे भोगले जे जगलो तेच माझ्या साहित्यातून चित्रीत केले आहे. मला साहित्यलेखन करताना कधी कल्पनेचे पंख लावता आले नाहीत. माझ्या साहित्यात चित्रित केलेली माणसे ही माझी माणसे असून त्यांचा मी माझ्या साहित्यात कधी अपमान होऊ देणार नाही अशी साहित्यलेखनाची भूमिका घेणाऱ्या प्रतिभावंत साहित्यकाचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी वाटेगाव ता. वाळवा जि. सांगली येथे झाला.

अण्णा भाऊंनी मराठी साहित्य विश्वाचे दालन समृद्ध करताना मराठी साहित्यातील अनेक प्रकारांना खऱ्या अर्थाने श्रीमंत केले असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. त्यांनी कथा, कादंबरी, लावणी, पोवाडा, वगनाट्य, नाटक आणि प्रवासवर्णन या साहित्यप्रकारात विपूल लेखन केले. त्यांच्या सात कादंबऱ्यांवर मराठीत सात चित्रपटही निघाले अशा प्रतिभावंत साहित्यिकाने रशियाचा प्रवास केल्यानंतर तेथील समाज, संस्कृती, कला, विज्ञान व तंत्रज्ञान शिक्षण, शिस्तप्रिय आणि देशप्रेमाने भारावलेली माणसे चित्रित केली आहेत. या प्रवासवर्णनातून अण्णा भाऊंची नाविन्याच्या ध्यास घेणारीवृत्ती, बहुश्रुतता रसिकता, समाजसूचकता ताजेपणा, मनमोकळेपणा आणि उत्स्फूर्तता ही गुणवैशिष्ट्ये वाचकांना नजरेत भरताना दिसून येतात.

माझा रशियाचा प्रवास हे प्रवासवर्णनपर पुस्तक अण्णा भाऊंनी सन १९६०-६१ साली केलेल्या रशियाच्या प्रवासावर लिहिलेले आहे. ५७ पानांच्या या पुस्तकात एकूण आठ छोटी प्रकरणे आहेत. साम्यवादी विचारसरणीने भारावलेल्या अण्णा भाऊंनी रशिया देशातील सूक्ष्म निरीक्षण करून रशियातील कला संस्कृती, समाज, शिक्षण अशाबाबींचे वर्णन या पुस्तकात चित्रित केले आहे.

अण्णा भाऊ साठे यांची रशिया या देशाचा प्रवास करण्यासाठी 'इंडो सोव्हिएत कल्चर सोसायटीने' निवड केली होती. त्या निमंत्रणावरून ते रशियाच्या प्रवासाला निघाले होते. दिल्ली मार्गे अण्णा भाऊ मॉस्कोकडे निघणार होते त्यावेळी दिल्ली येथे कॉग्रेड खासदार श्रीपाद डांगे यांच्या घरी गेले. त्यांच्या घरी पाहुणचार घेऊन निघताना कॉग्रेड डांगे यांच्या पत्नी सौ. उषाताई डांगे अण्णा भाऊंच्या पाठीवरून हात फिरवत म्हणाल्या, 'आमचा अण्णा मॉस्कोला निघाला.' हे उद्गार आणि पाठीवरून फिरलेला मायेचा हात पाहून अण्णा भाऊ भारावून जाऊन म्हणतात, 'मला माझ्या आईची आठवण झाली.' अशा मायेच्या ममतेच्या अनेक मित्रांच्या शुभेच्छांचे वर्षाव घेऊन अण्णा भाऊ मातृभूमीचा निरोप घेणार होते. मातृभूमीचा निरोप घेत असताना रशिया विषयी मनात प्रचंड उत्सुकता निर्माण झाली होती. रशियात त्यांनी जे पाहिले तेच त्यांनी आपल्या प्रवासवर्णनात मांडले त्यातील कांही ठळक आणि महत्त्वाच्या बाबींचा येथे उलगडा खालीलप्रमाणे करता येईल.

देशभक्ती आणि इतिहासप्रिय रशिया :

अण्णा भाऊंनी मॉस्को शहरात उतरल्यापासून तेथील माणसांचे सूक्ष्म निरीक्षण केले. मॉस्को शहरात अण्णा भाऊंना कझकिना भेटतात ते म्हणतात हे मास्को म्हणजे आमचे हृदय आहे. हे त्यांचे वाक्य ऐकून भाऊंना रशियन माणूस देशावर किती प्रेम करतो हे पहायला मिळते. शिवाय अण्णा भाऊ रशियात जेथे जेथे फिरतात तेथे तेथे त्यांना माणुसकी आणि देशभक्तीने भारावलेला माणूस दिसतो.

अण्णा भाऊंनी जसा देशभक्तीने भारावलेला माणूस पाहिला तसाच रशियन माणूस आणि रशियन सरकार हे इतिहासप्रिय असलेले दिसून येते. लेनिनग्राड शहरापासून जवळच दुसऱ्या महायुद्धात ज्यांनी हौतात्म्य पत्करले त्यांची स्मृती कायम ठेवणारे उद्यान आहे. या उद्यानात हजारो लोक येताना फुले घेऊन येतात आणि त्या अग्नीकुंडापुढे उभे राहून हुतात्म्यांचे स्मरण करतात. याच लेनिनग्राडच्या म्युझियममध्ये हजारो वर्षा पूर्वीच्या वस्तु सांभाळून ठेवलेल्या आहेत. राजा सम्राट चंद्रगुप्तापासूनची अनेक गाणी अण्णा भाऊंनी येथे पाहिली रशियातील माणसांची देशभक्ती आणि इतिहासप्रेम पाहून अण्णा भाऊ भारावून गेले.

विज्ञान – तंत्रज्ञानात रशियाची उत्तुंग झेप :

रशियात महान समाजसत्तावादी क्रांती झाल्यानंतर विज्ञान आणि तंत्रज्ञानातही या देशाने उत्तुंग झेप घेतलेली अण्णाभाऊंनी पाहिले. भारतात वजन मोजण्याची जशी यंत्र बसवलेली असतात तशी मॉस्कोत थंड सरबत, गरम चहा देणारी यंत्र असतात हे सांगताना अण्णा भाऊ 'कलेचे माहेर' या छोट्या प्रकरणात म्हणतात की, आपल्याकडे कांही जागी वजनाची यंत्र दिसतात तशी यंत्र मी मॉस्कोत पहिली; परंतु मी वजनाऐवजी दोन रूबल तोंडात टाकताच पेलाभर थंड सरबत देतात. हे सांगण्याच कारण एवढच की, रशियात यंत्र माणसाची अगदी पाहुण्याप्रमाणे सेवा करतात सरबत – देणाऱ्या यंत्रापासुन दिगंतराचा भेद करणाऱ्या रॉकेटपर्यंत त्यांनी मारलेली दौड सर्वश्रुत आहे. मी त्यांचं वर गेलेल रॉकेट पाहिलं नाही मात्र जे वर जाऊन परत आलं आहे ते मला दिसलं अशी विज्ञान आणि तंत्रज्ञानात प्रगती केलेल्या रशियाचे वर्णन अण्णा भाऊंनी आपल्या प्रवासवर्णनात केले आहे.

विद्येचे वेड लागलेला देश :

रशिया म्हणजे विद्येचे वेड लागलेला देश आहे रशियन जनतेला प्रगतीचा पदर सापडलेला आहे जणू शिक्षणाची नदीच त्या देशात वाहते असे अण्णा भाऊंना वाटते. येथील माणसांना शिक्षणाचं महत्त्व कळालेलं असल्यामुळे तेथे निरक्षरतेचे प्रमाण अत्यल्प आहे. अण्णा भाऊ रशियातील एका शिक्षकाला निरक्षरते विषयी प्रश्न विचारताना म्हणतात 'तुमच्या देशात निरक्षतरेचे प्रमाण किती आहे? यावर ते शिक्षक उत्तर देतात, असेल की सात टक्के यावर अण्णाभाऊ विचारतात हे सात टक्के लोक आडाणी का राहून गेले? यावर विनोदी शैलीत ते शिक्षक म्हणाले हे सात टक्के लोक आडाणी आहेत, त्याचे कारण त्यांना चालता येत नाही, काही लोक पाळण्यात आराम करीत आहेत, कांही आईच्या पोटात आहेत? यावरून रशिया देशाला विद्येचे वेड लागलेले आहे असे अण्णा भाऊंनी आपल्या प्रवास वर्णनात वर्णन केले आहे.

रशिया कलेचे माहेर :

अण्णा भाऊ साठे यांना रशिया हा देश म्हणजे कलेचे माहेरघर वाटते, कारण रशियन सरकार आणि रशियन जनता कलेचा आदर करणारी आहे. प्रत्येक माणसाला कलेचे विलक्षण वेड आहे. खरी कला ही सदैव काळजाशी भिडून बोलत असते, तिला कोणाची गरज भासत नाही. हे रशियन जनतेने जपलेले दिसुन येते. रशिया देशात फिरत असताना अनेक ठिकाणी राजकीय नेत्यांचे पुतळे दिसत नसून तेथे कलावंत, साहित्यिकांचे पुतळे उभे केलेले आहेत शिवाय अनेक शहरातील रस्त्यांना अनेक साहित्यिकांची नावे दिली आहेत. यावरून असे दिसून येते की, रशिया हा देश कलेचे माहेरघर आहे.

अण्णा भाऊ साठे मॉस्को शहरात असताना रशियन कला पाहण्यासाठी जातात. तेथील बोलशॉय थिएटरात त्यांनी 'दगडाचे फुल' हे नृत्यनाट्य पाहिले हे नाटक पाहत असताना तेथील नाट्यगृहाची भव्य रचना, पितळी रंगाच्या गॅलऱ्या नि समोरचं प्रचंड व्यासपीठ, लाल मखमली खुर्च्या या सर्व भव्य रचना पाहून अण्णा भाऊंना स्वतःचा विसर पडतो. या नाटकात पायाच्या अंगठ्यावर भोवऱ्या प्रमाणे गरगर फिरणारी मुलगी आणि तिचे रशियन जनतेने टाळ्यांच्या प्रचंड गजराने केलेले

स्वागत पाहून अण्णा भाऊंना आश्चर्य वाटते. रशियन जनता आपल्या कलावंतांचे कसे कौतुक करते हे अण्णा भाऊ मॉस्कोच्या बोलशॉय चित्रगृहात पाहतात.

मॉस्को शहरात अण्णा भाऊंनी पाहिलेली दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे तेथे लहान मुलांसाठी वेगळी नाट्यगृहाची व्यवस्था आहे. तेथे तिकिट खरेदी पासूनची सर्वच कामे स्वतः लहान मुले अगदी शिस्तबद्ध पद्धतीने करतात याचे अण्णा भाऊंना आश्चर्य वाटते.

अण्णा भाऊ ज्यावेळी लेनीनग्राड शहारात कॉ. लेनीन यांच्या आयुष्यावरील सिनेमा पाहतात तेव्हा तेथील चित्रपटगृहाची भव्य रचना, चित्रपटातील दृश्य पाहून भारावून जातात तर ताश्कंद शहारात 'दिलाराम' नाटक पाहून या नाटकाची रचना, त्यातील दृश्य, राजवाडे, उंच गोपुरं, भयान सुरुंग, मोठमोठे साखळदंड हे पाहून अण्णा भाऊ स्वतःला विसरतात. या नाटकाचे साधे कथानक पण त्याची निर्मिती ही काळजाला भिडणारी होती. हे नाटक रंगमंचावर सादर व्हावे म्हणून रशियन सरकारने लाखो रुबल खर्च केल्याचे ऐकून रशियन सरकारची कले विषयीची भूमिका कशी सकारात्मक आहे याचेही आश्चर्य वाटते. कारण रशियात केलेला राजाश्रय मिळाल्याचे समाधान अण्णा भाऊंना वाटते. हे नाटक पाहून बाहेर येताच कॉ. नबी मोहमद यांनी अण्णा भाऊंना विचारले, कसं काय वाटलं हे नाटक? तेव्हा अण्णा भाऊंनी उत्तर दिले हे नाटक म्हणजे खऱ्या प्रेमाचं एक भव्य स्मारक आहे आणि हे भव्य स्मारक सोविएत सरकारनं लाखो रुबल खर्चून उभारले आहे. हा देश म्हणजे कलेचे माहेरघर आहे?

रशियाचे सौंदर्य :

रशिया देशात जसा इतिहास, कला, संस्कृती, साहित्य यांची जपणूक केली जाते तसे रशियातील अनेक शहरे ही सौंदर्य संपन्न आहेत. हे सांगताना अण्णा भाऊ म्हणतात मॉस्को पाहावे संध्याकाळी, लेनीनग्राड पाहावे दिवसा, स्टॉलीनग्राडचा मर्दपणा युद्धात आणि बाकुचे सौंदर्य रात्री असा रशिया हा देश सौंदर्य संपन्न आहे. या देशात दारिद्र्य फारसे पहावयास मिळाले नाही. एखादी लबाड सत्ता डोंगराएवढे सत्य दडवू शकेल, पण तिला दारिद्र्य मुळीच दवडता येत नाही. कारण दारिद्र्य हे क्रूर आणि नग्न असते पण हेच दारिद्र्य रशियात झालेल्या महान ऑक्टोबर क्रांतीने जाळून टाकले होते असे अण्णाभाऊंना रशियाच्या प्रवासात जाणवले.

'माझा रशियाचा प्रवास' हे अण्णा भाऊ साठे लिखित प्रवास वर्णन असून हे पुस्तक म्हणजे एका प्रतिभावंत साहित्यिकाने केलेला प्रवास आहे. या प्रवास वर्णनपर पुस्तकातून अण्णा भाऊंच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलु वाचकांच्या नजरेत भरतात तसेच रशियाचे त्यांनी केलेले सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय कला, साहित्य, कृषी विषयक, शैक्षणिक या सर्वचबाबींचे वर्णन हे अप्रतिम आणि वाचकांच्या मनावर परिणाम करणारे आहे असे एका प्रतिभावंत साहित्यिकाने लिहिलेले हे प्रवास वर्णन म्हणजे मराठी वाचकांची एक मेजवानीच आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

संदर्भ :

१) साठे अण्णा भाऊ : 'माझा रशियाचा प्रवास' सुरेश एजन्सी, पुणे सहावी आवृत्ती जून २००५.
२) कोरडे बजरंग : भारतीय साहित्याचे निर्माते, अण्णा भाऊ साठे, साहित्य अकादमी, नवी दिल्ली.
3) डॉ.जवळगेकर शिवाजी : 'जननायक अण्णा भाऊ साठे', साहित्य भूषण अण्णा भाऊ साठे कला अकादमी व संशोधन केंद्र, लातूर प्रथम आवृत्ती ऑगस्ट २००८.